सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२६०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd fl oor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

माझगाव कार्यालय

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव,मुंबई ४००२०३ ☎ २३७८९७०१/०४/०५/०६/०८ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎ 23789701/04/05/06/08 Fax : 23781061

ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

## सहायक (मुख्य) परीक्षा २०१४

**फाईल क्रमांक :१४४२(३)(२)/२०१४/ तीन** **अधिसूचना क्रमांक : १८५/२०१४**

जाहिरात क्रमांक - १२५/२०१४, दिनांक २८ एप्रिल, २०१४ नुसार राज्य शासनाच्या मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयातील सहायक, गट - ब (अराजपत्रित) पदांवरील नियुक्तीकरिता आयोगामार्फत दि. १५ जून, २०१४ रोजी घेण्यात आलेल्या **सहायक (पूर्व )परीक्षा - २०१४** च्या निकालाआधारे मुख्य परीक्षेसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची **सहायक (मुख्य) परीक्षा -२०१४ रविवार दिनांक २ नोव्हेंबर, २०१४ रोजी** फक्त **मुंबई केंद्रावर घेण्यात येईल.** पूर्व परीक्षेकरीता आयोगास अर्जाद्वारे सादर केलेल्या माहितीच्या आधारेच प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. जे उमेदवार अर्जामध्ये चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व यापुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

**२.**उपलब्ध पदसंख्या :- मंत्रालयीन विभाग १४० पदे व महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालय ४ पदे.

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदाचे नाव व एकूण पदसंख्या** | **अराखीव** | **अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित** | **अनुसूचित जमाती** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **वि.मा.प्र.** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** |
| ( १) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | **सहायक (एकूण पदे १४४)** | ५९ | १८+५ ▼ | ७+५ ▼ | १ | ६ | ५+१ ▼ | २ | ५+३ ▼ | २७ ▼ |
| | **महिला** * | १८ | ७ | ३ | -- | २ | २ | १ | २ | ८ |
| | **खेळाडू** ☑ | ३ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | **विकलांग व्यक्ती @** | एकूण १ पद = चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - १ पद | | | | | | | | |

▼ **अशी खूण केलेली पदे अनुशेषाची आहेत. * अशी खूण केलेली पदे महिलांसाठी आरक्षित आहेत. ☑ अशी खूण केलेली पदे खेळाडूंकरिता आरक्षित आहेत. @ अशी खूण केलेली पदे विकलांग व्यक्तींकरिता आरक्षित आहेत.**

**२.१** उपरोक्त पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या संवर्गाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

**२.३** वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज.(क) व भ.ज. (ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध् न झाल्यास वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज. (ड) वर्गवारीपैकी उपलब्ध् वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**२.४** महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.५** खेळाडूंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. खेळाडुसाठी आरक्षित पदाकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडु असल्याबाबतची प्रमाणपत्रे मुळ प्रमाणपत्रांच्या तपासणीसाठी आमंत्रित केल्यानंतर, प्रमाणपत्रांच्या तपासणीकरीता येण्यापूर्वी क्रिडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

**२.६** अपंग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल. अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.७** अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे अनिवार्य आहे.

**२.८** प्रस्तुत पदासाठी चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू या विकलांगता प्रकाराकरिता १ पद राखीव आहे. तथापि, शासन निर्णय सा.प्र.वि. क्र. एएससी १४११/प्र.क्र.७/११/१४-अ, दिनांक १३ जानेवारी, २०११ नुसार इतर विकलांगता (अंधत्व किंवा क्षीणदृष्टी व श्रवणशक्तीतील दोष) असलेले उमेदवार त्या त्या जातीच्या वर्गवारीतून सदर पदाकरिता अर्ज करु शकतात.

**३. लेखी परीक्षा :-** पेपर क्र.१. **१०० गुण.** व पेपर क्र.२. **१०० गुण. एकूण २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची** असेल.

**४. पात्रता :-**

**४.१ शैक्षणिक अर्हता :-**

**४.१.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**४.१.२** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**४.१.३** सहायक (मुख्य) परीक्षा-२०१४ करिता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांनी सहायक (मुख्य) परीक्षा - २०१४ परीक्षेची अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**४.१.४** अंतर्वासिता (INTERNSHIP) निर्धारित केली असेल अशी पदवी धारण करणा-या उमेदवारांनी अंतर्वासिता मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

**४.२ वयोमर्यादा :-** १ ऑगस्ट, २०१४ रोजी **किमान १९ वर्षे** असावे व **३३ वर्षापेक्षा** जास्त नसावे.

**४.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-**

**४.३.१** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता ५ **वर्षापर्यंत.**

**४.३.२ अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षापर्यंत.**

**४.३.३** पात्र खेळाडूंच्या बाबतीत **५ वर्षापर्यंत.**

**४.३.४** माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा शासकीय आदेशानुसार शिथिलक्षम राहील.

**४.३.५**आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ठ अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल केली जाईल.

**४.३.६ विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.**

**५. शुल्क :**   **५.१** :- अमागास - रु. ५१५/-   **५.२** :- मागासवर्गीय - रु. ३१५/-   **५.३**:- माजी सैनिक – १५/-

**६. अर्ज करण्याची पद्धत :-**

**६.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**६.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (**Web-based**) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in वेबसाईटद्वारे **दिनांक १२ सप्टेंबर,२०१४ ते दिनांक ३ ऑक्टोबर, २०१४** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**६.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**६.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**६.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल.
(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

**६.६** https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटवर, संग्राम केंद्र (ग्रामपंचायंत) आणि सीएससीची सूची उपलब्ध आहे.

**६.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते " " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर **Unpaid** ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी " **'Pay Now'** अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) **"Pay Now"** या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेल्या उमेदवाराने अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(८) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्काचा भरणा करतील, असे उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. जर हा दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यावाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

**६.८** प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**७.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**८.** प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशिल दिलेला आहे. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्ज करण्याची पध्दत आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत उमेदवारांना सर्वसाधारण सूचना तसेच परीक्षा विभागातील पोलीस उपनिरीक्षक परीक्षामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली पोलीस उपनिरीक्षक परीक्षेबाबतची माहिती तसेच अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**९.** विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ३ ऑक्टोबर,२०१४ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१०.** चलनाद्वारे **परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास** भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ४ ऑक्टोबर, २०१४** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा **शुल्क** भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा **शुल्काचा** परतावाही केला जाणार नाही.

**११.** सहायक (मुख्य) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपल्ब्ध आहे.

**मुंबई**
**दिनांक :१२ सप्टेंबर,२०१४.**

**श्री.शं. पाठक**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) प्रमाणपत्र तपासण्याच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.**